# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **मराठी विभाग – राज्यस्तरीय चर्चासत्र**

सकाळ
रविवार,
७ फेब्रुवारी २०१६
१०

# देशाच्या जडणघडणीत पवार यांचे योगदान

## मीना जगधने यांचे गौरवोद्गार; राजगुरुनगरला राज्यस्तरीय चर्चासत्र



**राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात लोकनेते शरद पवार यांच्या जीवनकार्यावर आयोजित चर्चासत्रात बोलताना पवार यांच्या भगिनी मीना जगधने.**

राजगुरुनगर, ता. ६ : "सत्ता हे सेवेचे माध्यम मानताना सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राजकारण करणाऱ्या शरद पवारांनी महाराष्ट्र आणि देशाच्या जडणघडणीत अलौकिक योगदान दिले. त्यांचे जीवन व कार्य समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभासारखे आहे," असे गौरवोद्गार रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य आणि शरद पवार यांच्या भगिनी मीना जगधने यांनी काढले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने 'लोकनेते शरद पवार : जीवन व कार्य' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केले होते. त्यात बीजभाषण करताना त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, ॲड. राम कांडगे, डी. ए. माने, प्राचार्य डॉ. मंजुश्री बोबडे, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, डॉ. स्नेहल तावरे, डॉ. अविनाश आवलगावकर, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, आकाश नवरे आणि विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

जगधने म्हणाल्या, "शरद पवारांच्या कर्तृत्वामागे आई शारदाबाई आणि वडील गोविंदराव पवार यांनी केलेले संस्कार कारणीभूत आहेत. शिक्षणाबद्दल कळवळा असलेले पुरोगामी विचारांचे व समाजभान असलेले आमचे आई-वडील होते. त्यांच्या संस्कारांचा परिणाम आम्हा सर्व भावंडांवर झाला. हुशारी, धाडस, प्रसंगावधान, स्मरणशक्ती हे गुण शरदरावांनी आईकडून घेतले."

'विज्ञान व तंत्रज्ञान, साहित्य, संगीत, क्रीडा, शेती, उद्योजक या सर्व विषयांत रुची आणि गती असणारे शरद पवार हे एकमेव नेते सध्याच्या राजकारणात पाहायला मिळतात. त्यांच्याइतकी राजकीय समज, उंची आणि ज्ञान असलेला नेता सध्या अपवादानेच सापडेल." असे त्या म्हणाल्या. भोईटे म्हणाले, "यशवंतरावांनी महाराष्ट्राला शरदरावांच्या रूपाने विकासाची देणगी दिली आहे."

या वेळी तासगावचे डी. ए. माने यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. मराठी विभाग प्रमुख व समन्वयक डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख